दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे    संपादक : बंडूभाऊ इंगोले

वाशीम ■ बुधवार दिनांक 22 जानेवारी 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 247 ■ पाने : 4 किंमत : 5 रुपये Title code:- MAHMUL03935

# राज्यातील 329 वीज उपकेंद्रांचे खासगीकरण

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

नागपूर : राज्यात 'स्मार्ट प्री-पेड मीटर'विरोधात आंदोलन पेटले असतानाच, आता महावितरणकडून राज्यातील ३२९ उपकेंद्रांचेही खासगीकरण केले जाणार आहे. विशेष म्हणजे, त्यासाठीची निविदाही काढण्यात आली आहे. या निर्णयाविरोधात कर्मचाऱ्यांमधून संताप व्यक्त होत असून, महावितरण कंपनीसह ऊर्जा सचिवांना आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालवायला देणे म्हणजे महावितरण कंपनी विकण्याचा घाट असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी संयुक्त कृती समितीने केला आहे. महावितरणमध्ये वर्ग १ ते ४ या प्रवर्गातील ३२ हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. ही पदे तातडीने भरण्याचे लेखी कार्यवृत्त कृती समितीस महावितरणकडून दिले गेले होते. परंतु, भरतीची प्रक्रिया संथ असून, मंजूर पदांवर कंत्राटी पद्धतीने यंत्रचालकांची पदे भरणे म्हणजे खासगीकरणच असल्याचे समितीने म्हटले आहे.

महावितरणच्या निर्णयाविरोधात आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र राज्य वीज कामगार महासंघ, सबॉर्डिनेट इंजिनीअर असोसिएशन, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस आदी संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.



कंत्राटी पद्धतीने पदे भरल्यास हजारो यंत्रचालकांच्या पदोन्नतीच्या मार्गात अडथळे येतील. त्यामुळे उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने देण्याची निविदा रद्द करावी. तसे न केल्यास आंदोलन केले जाईल. या आंदोलनामुळे औद्योगिक शांतता भंग झाल्यास त्याला प्रशासन जबाबदार राहील.

– **कृष्णा भोयर**, राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन

महावितरणच्या खासगीकरणाचा प्रश्नच नाही. प्रशासनाने काही वीज उपकेंद्रे कंत्राटी पद्धतीने चालवण्यास देण्याबाबतची निविदा प्रकाशित केली आहे. त्याबाबत वरिष्ठ अधिकारी नियमानुसार निर्णय घेतील.

– **भारत पवार**, मुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, मुंबई

## महत्त्वाचे...



### तेजस एक्सप्रेसचे इंजिन बंद पडल्याने कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक विस्कळीत

रत्नागिरी : कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या सुपरफास्ट तेजस एक्सप्रेसचे इंजिन रत्नागिरी करबुडे दरम्यान बंद पडल्याने कोकण रेल्वे मार्गावरील रेल्वे वहातूक विस्कळीत झाली. मात्र या एक्सप्रेसला नवीन इंजिन जोडण्यात आल्याने एका तासाने या रेल्वे मार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात कोकण रेल्वे प्रशासनाला यश आले आहे.कोकण रेल्वे मार्गावर धावणारी सुपरफास्ट तेजस एक्सप्रेस ही रेल्वे गाडी रत्नागिरी करबुडे दरम्याने आली असता या गादीचे इंजिन अचानक बंद पडले. हा प्रकार मंगळवार २१ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडला. इंजिन बंद पडल्याने कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या काही गाड्या ठीक ठिकाणी थांबवण्यात आल्या.

इंजिन नादुरुस्त झाल्याने कोकण रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा एका तास खोळंबा झाला. रत्नागिरी रेल्वे स्थानकातून नवीन इंजिन मागवण्यात येऊन तेजस एक्सप्रेस ही गाडी एका तासानंतर मार्गस्थ करण्यात आली. तेजस या गाडीला दुसरे इंजिन जोडल्यानंतर कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक दुपारी एक वाजण्याच्या सुमारास पुर्ववत झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला.

### फलटणमधील मृतदेहाचे अवशेष चारही दिशांना फेकले, अंधश्रद्धेतून महिला खून प्रकरण

सातारा : विडणी (ता. फलटण) येथे अज्ञात महिलेचा अंधश्रद्धेतून शुक्रवारी खून झाल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांच्या तपासात रोज नवनवे खुलासे येऊ लागले आहेत. सलग तिसऱ्या दिवशी मृतदेहाचे अवयव, शोधण्याचे काम सुरू असून, रविवारी एका ठिकाणी शेतात मृतदेहाचे काही अवयव पोलिसांना आढळून आले. आज या परिसरात पोलिसांना खून करण्यासाठी वापरली जाणारी तीन शस्त्रे मिळून आली. खून करून चारही दिशांना मृतदेहाचे अवशेष टाकून नैवेद्याचा नरबळी दिल्याचा पोलिसांना संशय आहे.

## छत्तीसगड-ओडिशा सीमेवर चकमकीत 14 नक्षलवादी ठार



गडचिरोली : छत्तीसगड-ओडिशा सीमेवर मंगळवारी सकाळी झालेल्या चकमकीत १४ नक्षलवाद्यांना ठार करण्यात छत्तीसगड पोलिसांना यश आले. मृत नक्षलवाद्यांमध्ये ओडिशा राज्याचा प्रभारी, केंद्रीय समिती सदस्य जयराम ऊर्फ चलपती याचा समावेश असून त्याच्यावर विविध राज्यांमध्ये एक कोटीपेक्षा अधिकचे बक्षीस होते. मिलिंद तेलतुंबडेनंतर चकमकीत ठार झालेला जयराम हा दुसरा केंद्रीय समिती सदस्य आहे. अजूनही चकमक सुरू असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. छत्तीसगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळच्या सुमारास छत्तीसगड-ओडिशा सीमेवरील गरियाबंद जिल्ह्यातील मैनपूर कुल्हाडीघाट जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती सुरक्षा यंत्रणेला मिळाली होती. यावरून त्या भागात एक हजारहून अधिक सुरक्षा जवानांनी नक्षलविरोधी अभियान राबावले. दरम्यान, जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. सुरक्षा जवानांनीदेखील प्रत्युत्तर दिले.

## पतीला झोपेच्या गोळ्या देऊन पत्नी हॉटेलमध्ये युवकासोबत "नको त्या अवस्थेत"

*विदर्भ कल्याण /प्रतिनिधी*

नागपूर : महिलांच्या किटी पार्टीत आयोजक महिलांनी काही 'जिगोलो' युवकांना बोलावले. तेथून संपर्कात आलेल्या एका जिगोलोला एक महिला वारंवार नागपुरात बोलवत होती. पतीला झोपेच्या गोळ्या देऊन ती थेट मोठ्या हॉटेलमध्ये त्या युवकासोबत रात्र घालवत होती. मात्र, पतीला संशय आल्यामुळे पत्नीचे बींग फुटले. हॉटेलमध्ये जिगोलोसोबत नको त्या अवस्थेत पत्नी आढळून आली. या घटनेची पोलिसांत जरी तक्रार नसली तरी शहरभर मोठी चर्चा आहे.





सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका वाहतूकदार असलेल्या युवकाने वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत ट्रान्सपोर्टचा व्यवसाय सुरू केला. त्यातून त्याला सुबत्ता आली. त्याने स्वत:साठी आणि पत्नीसाठी स्वतंत्र कार घेतल्या. उच्चशिक्षित असलेल्या पत्नीला महिलांच्या किटी पार्टीत आणि मैत्रिणींनी आयोजित केलेल्या पार्टीत वारंवार जाण्याची सवय होती. दुसरीकडे पती सकाळपासून ते मध्यरात्रीपर्यंत कामात व्यस्त राहत होता. काही महिन्यांपूर्वी त्या महिलेच्या मैत्रिणींनी वर्धा रोडवरील एका मोठ्या हॉटेलमध्ये किटी पार्टी आणि स्नेहमिलन आयोजित केले. रात्रभर चालणाऱ्या पार्टीत 'एस्कॉर्ट सर्व्हिस' पुरविणाऱ्या कंपनीकडून काही 'जिगोलो' (पुरुष वेश्या) बोलावण्यात आले होते. पार्टी संपल्यानंतर दिल्लीतील एका 'जिगोलो' युवकाचा मोबाईल क्रमांक महिलेने घेतला. काही दिवसांनंतर तिने त्याला फोन केला. 'स्पेशल सर्व्हिस' म्हणून विमानाचे तिकिट आणि मोबदला म्हणून १ लाख रुपये त्या युवकाने मागितले. महिलेने सर्व अटी मान्य करीत पैसेही दिले. तेव्हापासून ही महिला त्या युवकाला पैसे देऊन दिल्लीवरुन नागपुरात बोलवित होती. अनेकदा तो युवक नागपुरात येऊन गेला. दोघेही रात्रभर महागड्या हॉटेलमध्ये वेळ घालवत होते. पहाटेच्या सुमारास महिला घरी परत येत होती.दर महिन्याला त्या युवकासोबत रात्र घालविता यावी, यासाठी महिला पतीला जेवनातून झोपेच्या गोळ्या देत होती. तो झोपल्यानंतर बाहेरुन दार लावून ती कारने वर्धा रोडवरील हॉटेलमध्ये जात होती. तेथे त्या युवकासोबत रात्र घालवायची. पहाटे घरी परत येत होती. हा प्रकार गेल्या काही महिन्यांपासून सुरु होता.

## दुभाजकाला धडकून कारचे दोन तुकडे; महिला ठार, पाच जखमी

नागपूर : नागपुरात असलेला लग्नसोहळा आटोपून मूर्तीजापूरला जाण्याकरिता कारने निघालेल्या कुटुंबीयांची कार अनियंत्रित झाल्यामुळे रस्ते दुभाजकाला धडकली. भीषण अपघातात कारचे चक्क दोन तुकडेच झाल्याने कारमधील पाचही जण गंभीर जखमी झाले. अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. समृद्धी महामार्गाच्या सर्कलच्या अलिकडे वेणा नदीजवळ हा अपघात झाला. आशादेवी रमेशचंद्र लाहोटी (६७, रा. वाशिम) असे मृत महिलेचे नाव आहे. तर अपघातात त्यांचे दोन मुले, सून व एक नातेवाईक दाम्पत्य जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लाहोटी कुटुंबीय हे नागपूरला लग्नासाठी कारने (एमएच ३७ व्ही ४३३३) आले होते. लग्नसोहळा आनंदात आटोपला. सर्व नातेवाईकांच्या भेटी घेऊन सोमवारी रात्री ११ वाजता लाहोटी कुटुंब मूर्तीजापूरकडे परत निघाले. मुलगा रोहित रामेशचंद्र लाहोटी (३६) हा कार चालवत होता. यावेळी कारमध्ये त्याची आई आशादेवी लाहोटी, पत्नी तिलक लाहोटी (३२), भाऊ रोशन लाहोटी (३५) व मूर्तीजापूर येथे राहणारे नातेवाईक दाम्पत्य दिनेश मोहनलाल मालानी (३८) आणि सुनिता मालानी (३३) हे सर्व जण कारमध्ये बसले होते.

ते जबलपूर मार्गाने अमरावती मार्गावर जात होते. मध्यरात्र झाल्यामुळे कारचालकाला झोप येत होती.

## सुरक्षा यंत्रणांना अनेक दशके हुलकावणी देणारा माओवादी अखेर ठार

### डोक्यावर 1 कोटीचे बक्षीस असलेला 'चलपती' नेमका होता तरी कोण?

*विदर्भ कल्याण /वृत्तसंस्था*

अनेक राज्यातील सुरक्षा यंत्रणांना अनेक दशके हुलकावणी देणारा प्रताप रेड्डी रामचंद्र रेड्डी उर्फ चलपती (६२) हा सुरक्षा यंत्रणाबरोबर झालेल्या चकमकीत ठार झाला आहे. ओडिशाच्या सीमेजवळ छत्तीसगढच्या गरिआबंद जिल्ह्यातील व्याघ्र प्रकल्पात ही चकमक झाली, ज्यामध्ये चलपती याला ठार करण्यात आले आहे. माओवाद्यांच्या रँकमध्ये अत्यंत झपाट्याने वर चढलेल्या चलपती याने अनेक हाय-प्रोफाइल हल्ले घडवून आणले होते, ज्यात एक आमदाराच्या हत्येचे प्रकरणाचा देखील समावेश आहे. इंडियन एक्सप्रेसने एका सुरक्षा अधिकाऱ्याच्या हवाल्याने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

रेड्डी हे आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यातील मातेमपैपल्ली (Matempaipally) गावातील असून २३ सप्टेंबर २०१८ रोजी अराकूच्या डंब्रिगुडा भागात झालेल्या हल्ल्याचा तो मास्टरमाईंड असल्याचा सुरक्षा यंत्रणांचा दावा आहे. या हल्ल्यात अराकू व्हॅलीतील टीडीपीचे आमदार किदारी सर्वेश्वर राव (Kidari Sarveswara Rao) आणि माजी टीडीपी आमदार सिवेरी सोमा (Siveri Soma) यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या दोन टीडीपी नेत्याची हत्या करणाऱ्या माओवाद्यांच्या गटाचे नेतृत्व हे रेड्डी याची पन्ही पत्नी अरुणा हिने केल्याचा आरोप आहे १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात जेव्हा रेड्डी लहान होता तेव्हा तो सीपीआय (मार्क्सवादी लेनिनवादी)च्या पीपल्स वॉर ग्रुप(PWG) च्या विचारधारेकडे ओढला गेला. पुढे त्याने इंटरमिडीयट नंतर शिक्षण सोडले आणि तो श्रीकाकुलम येथे गेला आणि पीडब्लूजीमध्ये सहभागी झाला.

माओवाद्यांची माहिती गोळा करणाऱ्या स्पेशल इंटेलिजन्स ब्युरोने (SIB) तयार केलेल्या डॉजियरमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, त्याने श्रीकाकुलमच्या उद्दानम भागात काम केले आणि त्याला पक्षाच्या सदस्यावरून विभागीय समिती सदस्य (डीसीएम) बनवण्यात आले होते. रेड्डी याला प्रताप, रवी आणि जयराम अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात असे. स्पेशल इंटेलिजन्स ब्यूरो (SBI) ने तयार केलेल्या माओवाद्यांबद्दल सविस्तर माहिती देण्यात आलेल्या डॉजियरमध्ये सांगण्यात आलं आहे की, तो श्रीकाकुलमच्या उड्डानम भागात काम करत होता आणि पक्ष सदस्यपदाहून त्याची बढती डिव्हीजनल कमिटी मेंबर (DCM) अशी करण्यात आली होती. रेड्डी वेगवेगळ्या नावाने ओळखला जात असे, ज्यामध्ये प्रताप, रवी आणि जयराम अशा नावांचा समावेश आहे.

डिसेंबर २००० मध्ये त्याला स्पेशल झोनल कमिटी मेंबर बनवण्यात आले आणि त्याच्याकडे स्टेट मिलीटरी कमिशन ऑफ आंध्र ओडिशा बॉर्डर स्पेशल झोनल कमिटीची जबाबदारी देण्यात आली. त्याचे गनीमी पद्धतीचे युद्ध आणि रणनीती आखण्याचे ज्ञान, यामुळेच त्याची पदोन्नती इतक्या लवकर झाली असे सांगितले जाते.सीपीआय (माओवादी) चे सेंट्रल मिलीटरी कमिशन देखील हाय प्रोफाईल हल्ल्यांसाठी तसेच नवीन माओवाद्यांच्या भरतीसाठी रेड्डीवर अवलंबून होते. तीन दशकांहून अधिक काळ आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती



भागात हल्ल्यांची योजना आखून त्यांचे नेतृत्व केल्याचा आरोप त्याच्यावर होता. मे २०१६ मध्ये अनेक दशके भूमिगत राहिल्यानंतर अखेर विशाखापट्टणममध्ये चकमकीत ठार झालेल्या एका माओवादी नेत्याच्या लॅपटॉपवर रेड्डीचा त्याच्या पत्नीबरोबरचा एक सेल्फी सापडला. त्यानंतरच तो नेमका कसा दिसतो हे आंध्र प्रदेश पोलिसांना माहिती झालं.

डेप्युटी कमांडर अरूणा उर्फ चैतन्य व्यंकट रवी हिच्याबरोबर प्रेम संबंधांमुळे २०१० मध्ये रेड्डी याला एक वर्षासाठी निलंबीत देखील करण्यात आले होते.

पुढे या दोघांनी लग्न केले. तसेच २०१२ मध्ये तांत्रिक चुकीमुळे एका सहकाऱ्याचा मृत्यू झाल्याने त्याची पदावनत देखील करण्यात आले होते.

सध्या रेड्डी हा ओडिशा राज्य समितीचा सचिव होता आणि त्यांच्या डोक्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस होते. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्याला गुडघेदुखी त्रास होता आणि त्याने आंध्र-ओडिशा सीमेवर अनेक ठिकाणी गुपचूप उपचार घेतले होते.

गाव तेथे वार्ताहर!

संपूर्ण राज्यात जिल्हा/ तालुका/ शहर व ग्रामस्तरावर

वार्ताहर/ जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे

दैनिक महाराष्ट्र जीत

संपर्क

मुख्य संपादक

सागर राणा अंभोरे

99210 45121

संपादक

बंडूभाऊ इंगोले

96044 30002

दैनिक
# महाराष्ट्र जीत
बुधवार दिनांक 22 जानेवारी 2025



## संपादकीय

### वॉशिंग्टनची कुऱ्हाड!

अमेरिकेचे नवे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सत्तारोहणाचे थेट प्रक्षेपण पाहताना नक्की कोणकोणत्या भावना दाटून आल्या याचे वर्णन करता येणे अशक्य. अमेरिकी जनतेविषयी कमालीची कणव, निखळ विनोदाचा जागतिक नमुना पाहत असल्याचा निर्भेळ आनंद, पोट धरधरून हसणे, काही विधानांमुळे पुन:प्रत्ययाचा आनंद इत्यादी इत्यादी विविध भावतरंग हा सोहळा पाहत असताना सातत्याने उमटले. त्यांची ''अमेरिकेचा ऱ्हास आजपासून थांबणार'', ''अमेरिकी जनता आजपासून खरी स्वतंत्र होणार'', ''अमेरिकेच्या सुवर्णयुगास आजपासून सुरुवात'' आदी विधाने बहुसंख्यांस प्रतिध्वनीसम भासली असणार तर त्या विधानांमुळे काही अल्पसंख्यांच्या कपाळावरील आठ्यांची संख्या वाढली असणार. जे कोणी बहुसंख्य वा अल्पसंख्य या दोहोंत नसतील, त्यांच्या मनात हे सारे याआधी कोठे बरे ऐकले असा प्रश्न निर्माण झाला असणार आणि आपण अमेरिका या एकमेव महासत्ता प्रमुखाचे सत्तारोहण पाहत आहोत की टिंबक्टु देशाच्या प्रमुखाचे असाही प्रश्न त्यांस पडला असणार. एकाच वेळी विनोद आणि करुणा, उपहास आणि उद्वेग अशा परस्परविरोधी भावना जागृत करण्याची या सोहळ्याची- आणि या समारंभाचे नायक ट्रम्प यांची- क्षमता वादातीत म्हणायला हवी. त्यांचा दुसऱ्या खेपेचा चार वर्षांचा सत्ताकाळ या सोहळ्याने सुरू झाला. त्यामुळे आगामी काळात त्यांच्या या गुणांचा प्रत्यय आपणास येणार असल्याने त्याविषयी अधिक काही भाष्य न करता त्यांनी सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर जे काही निर्णय घेतले त्यांची दखल घेतलेली बरी.

मेक्सिकोच्या आखाताचे 'अमेरिकेचे आखात' असे नामकरण, पनामा कालवा पुन्हा अमेरिकेच्या ताब्यात घेणे, पर्यावरणाशी संबंधित पॅरिस करारातून अमेरिकेने बाहेर पडणे, अमेरिकी तेल कंपन्यांना हवे तितके तेल उपसू देण्याची मुभा असणे, जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्यत्वाचा त्याग करणे, मेक्सिको-अमेरिका सीमेवर आणीबाणी जाहीर करून तेथील व्यवस्था संरक्षण दलाच्या हाती देणे अशा एकापेक्षा एक निर्णयांचा ट्रम्प यांचा धडाका यानिमित्ताने जगाने अनुभवला. अलीकडे 'ढ' व्यक्तींच्या वाटेल त्या कृत्यांस धडाडी म्हणण्याची प्रथा पडली असून ती चांगल्या प्रकारे रुजलेली दिसते. ट्रम्प यांचा पहिल्याच दिवसातील हा निर्णयधडाका धडाडी या गुणाविषयी खचितच प्रश्न निर्माण करतो. हे इतकेच नाही. यापुढे अमेरिकेत 'पुरुष' आणि 'स्त्री' हा पारंपरिक भेदच फक्त अधिकृत मानला जाईल. म्हणजे पारलिंगी (एलजीबीटीक्यू) व्यक्तींस त्या देशात यापुढे काहीही स्थान राहणार नाही. जन्माला आलेल्या प्रत्येक जिवाने पुरुष तरी असायला हवे अथवा स्त्री. हे दोन्हीही नसलेले वा दोन्हीही असलेल्यांस अन्यत्र 'चले जाव' असा ट्रम्प यांचा आदेश असेल. गेल्या निवडणुकीत डेमोक्रेटिक पक्षाच्या जो बायडेन यांनी ट्रम्प यांचा पराभव केला. तो निकाल जितका राजकीय होता त्यापेक्षा ट्रम्प यांच्यासाठी पुरुषार्थास हात घालणारा होता. त्यानंतर ट्रम्प यांचे समर्थक 'कॅपिटॉल हिल'वर चालून आले आणि त्यांना ट्रम्प यांची फूस होती. अशा दीड हजार दंगेखोरांस त्या वेळी सुरक्षा यंत्रणांनी ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर खटले भरले. त्या सर्वांस ट्रम्प यांनी पहिल्याच दिवशी माफी दिली. म्हणजे सरकारविरोधातील बंडदेखील आता अमेरिकेत शिक्षापात्र नाही. यातील काही निर्णयांची घोषणा तातडीने झाली असली तरी त्यांचे परिणाम दूरगामी असतील. उदाहरणार्थ वसुंधरा रक्षणाच्या पॅरिस करारातून तसेच जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिकेने बाहेर पडणे. पर्यावरणाच्या मुद्द्यावर आधीच विकसित आणि विकसनशील देशांत मोठी दरी आहे. पर्यावरण रक्षणार्थ विकसनशील देशांनी उपाय योजायचे पण त्याबदल्यात विकसित देशांनी त्या खर्चाचा भार उचलण्यास नकार द्यायचा असा हा वाद. पर्यावरणाचा इतका ऱ्हास झालेला आहे तो विकसित देशांच्या आतापर्यंतच्या धोरणांमुळे. पण पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उपायांमुळे पोटास चिमटा बसणार तो विकसनशील देशांच्या असा हा व्यापार. आता तर या सगळ्याच जबाबदारीतून अमेरिका स्वत:स मुक्त करणार. म्हणजे पॅरिस करार जवळपास बोंबलला असे म्हणायचे. त्यात हा गृहस्थ अमेरिकी तेल कंपन्यांस हव्या तितक्या तेल विहिरी खणा असे म्हणतो. इतकेच नाही तर आतापर्यंत सर्व प्रकारच्या पर्यावरणीय धोक्यांपासून दूर ठेवल्या गेलेल्या अलास्का प्रांतातही तेल उत्खननादी व्यवहार सुरू करणार असे म्हणतो, म्हणजे सगळाच आनंद. तीच बाब आरोग्य संघटनेबाबत. ट्रम्प अत्यंत विज्ञानद्वेषी आहेत. करोनाकाळात जगाने त्याचा अनुभव घेतला. माणसे त्या काळात औषधोपचारांअभावी मरत असतानाही त्यांचा करोना लशीस विरोध होता. या संकटसमयी आपली मते आपल्यापाशी ठेवावीत, इतका पोच त्यांस नाही. त्यामुळे त्यांनी लशींस असलेला विरोध व्यक्त केला. त्या काळात जागतिक आरोग्य संघटना सक्रिय होती आणि अमेरिकेची डॉ. अँथनी फौची यांच्यासारखी व्यक्ती साथ नियंत्रणात आघाडीवर होती. आता अमेरिका या संघटनेतूनच बाहेर पडणार आहे. याच गतीने ट्रम्प कारभार करत राहिले तर उद्या हा इसम 'संयुक्त राष्ट्रा'तून अमेरिकेस वेगळे करण्यास कमी करणार नाही. या संघटनेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे. न जाणो तेही येथून हलवा असे ते म्हणणारच नाहीत, याची खात्री नाही. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्या घेतल्या ट्रम्प यांनी स्थलांतरितांवर लगेच आसूड चालवायला सुरुवात केली. हे स्थलांतरित हा त्यांचा मोठाच रागाचा विषय. या मुद्द्यावरही ट्रम्प यांची तळी उचलणारे आपल्याकडेही मोठ्या संख्येने आहेत. या आसूडाचे वळ आपल्या पाठीवर उमटत नाहीत तोपर्यंत अशा उपायांचे स्वागत केले जाते. या ट्रम्प स्वागतोत्सुकांस हे माहीत नसेल की कोणतेही अधिकृत परवाने नसताना अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या भारतमातेच्या सुपुत्रांची संख्या जवळपास ७.५ लाख इतकी आहे. यातील अनेकांस ट्रम्प यांचा बडगा बसून पुन्हा स्वदेशसेवेस यावे लागेल. इतकेच नाही, तर ट्रम्प यांनी सरकारवर नवीन नेमणूक बंदी जारी केली. याचा अर्थ अमेरिकेत नव्या नोकऱ्या आता तितक्या संख्येने मिळणार नाहीत आणि ज्यांना त्या मिळालेल्या आहेत, त्यांच्या त्या राहतीलच याची हमी नाही. आपले अनेक तरुण अभियंते/ कुशल कामगार/ कारकून इत्यादी अमेरिकेत स्थानिकांपेक्षा कमी वेतनात काम करतात. स्थानिकांच्या दृष्टिकोनातून या गुणवान मजुरांकडे पाहू गेल्यास त्यांचे वर्णन 'भय्ये' असेच करावे लागेल. येथील एके काळच्या शिवसेना वा नंतरच्या मनसेप्रमाणे ट्रम्प त्या देशातील सर्व भय्यांस हाकलून लावू इच्छितात.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याच्या सरकारच्या कटकारस्थानाला महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचा प्रखर विरोध..!

महाराष्ट्र जीत : गुरुनाथ तिरपणकर

मुंबई- सरकारने लॉटरी व्यवसाय बंद करून गोरगरीब लॉटरी विक्रेत्यांच्या पोटावर पाय दिला तर मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन करून सरकारचा निषेध करणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास सातार्डेकर यांनी दिला आहे. राज्यातील लॉटरी विक्रेत्यांच्या संघटनानी आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवारी मुंबई मराठी पत्रकार संघात एका जाहीर पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. ५५ वर्षांचा इतिहास असलेली महाराष्ट्र राज्य लॉटरी सरकारी बाबू बंद करण्याच्या तयारीत आहेत. काही दिवसापूर्वी लॉटरी छपाई बंद केली आहे. आता पूर्ण व्यवसाय बंद करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आल्याने आम्ही प्रसिद्धी माध्यमातून सरकारला आंदोलनाचा इशारा देत आहोत, असे सातार्डेकर यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य पेपर व ऑनलाईन लॉटरी विक्रेता युनियनचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे म्हणाले की, परराज्यात लॉटरी व्यवसाय करोडो रुपयांचा महसूल देत असताना महाराष्ट्रात लॉटरी व्यवसाय बंद पाडण्याचे कारस्थान का रचले जात आहे ? यामागे सरकारचा काही तरी छुपा डाव आहे. यासाठी आम्ही लवकरच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहोत. लॉटरी एजन्टचे अध्यक्ष स्नेहल शहा म्हणाले, सरकारने जर महाराष्ट्र राज्य लॉटरीची योग्य प्रकारे जाहिरात केली तर यातून सरकारचा महसूल वाढेल आणि हा व्यवसाय बंद करण्याची सरकारवर वेळ येणार नाही. मात्र सरकार याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही हीच खरी शोकांतिका आहे. आज या लॉटरी व्यवसायावर अनेक गोरगरीब, अंध, अपंग, विधवा उदरनिर्वाह करत आहेत.












## जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धांत विकास मंदिर चे घवघवीत यश..

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



देवळाली कॅम्प -जिल्हा समाज कल्याण विभाग, सक्षम फाउंडेशन आणि सर्व स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थांच्या क्रीडा स्पर्धा अतिशय उत्साहात सेन्ट झेवियर स्कूल चे भव्य मैदानावर दिनांक 17 जानेवारी दरम्यान संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण 32 विशेष शाळेचे 800 विद्यार्थी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे उदघाटन नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी माननीय श्रीमती आशिमा मित्तल, यांचे शुभहस्ते झाले. या क्रीडा स्पर्धांकरिता उपायुक्त श्री माधव वाघ, समाज कल्याण अधिकारी, श्रीमती हर्षदा बडगुजर, फादर इरॉल फर्नांडिस, ऑगस्तीन डिमेलो, संचालक सेंट झेवियर स्कूल आदी सन्माननीय उपस्थिती होते. या स्पर्धांत दिव्यांग खेळाडूंमध्ये उत्साह, आवेश व जिंकण्यासाठी जिद्द दिसून आली. अटीतटीच्या लढतीं पाहून प्रेक्षक उत्साहीत होवून स्पर्धकांना प्रोत्साहन देत होते. या जोश पूर्ण झालेल्या स्पर्धांत विकास मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी 11 विविध क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांकाची बक्षिसे जिंकून राज्यस्तरीय स्पर्धेत जाण्याचा बहुमान पटकावला. या विद्यार्थ्यांना घडविण्यात प्रिती घोडके, बाळासाहेब भुजबळ, प्रवीण सूर्यवंशी, कल्पना सोनवणे, कारंडे, सरोदे आदि शिक्षकांनी परिश्रम घेतले. संस्थेच्या सचिव सुहासिनी घोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन या स्पर्धकांना लाभले. यशस्वी खेळाडूंवर सर्व थरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अखेर मास विक्रेत्यांना नव्या ठिकाणी हलवण्याचा निर्णय : आंदोलन स्थगित.

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

मालेगांव : - नगरपंचायतीच्या हद्दीतील हिंदू मोक्ष धाम परिसरात असलेल्या मास विक्रीच्या दुकानां बाबत आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठोस पाऊल उचलले आहे. त्यामुळे सुनिल शर्मा यांनी 21 जानेवारीपासून साखळी उपोषण आणि 24 जानेवारीपासून आमरण उपोषण आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने नगरपंचायतीने तातडीने कार्यवाही करीत विक्रेत्यांना नव्या ठिकाणी हलवण्याचा निर्णय घेतला आहे मुख्याधिकारी पंकज सोनुने यांनी दिलेल्या पत्रात तसे नमूद केले आहे की, "मास विक्रीची दुकाने आठवडी बाजारातील मागील ओळीत हलवण्यात येतील तिथे ताटवे लावून कोणत्याही प्रकारचा कचरा बाहेर दिसणार नाही याची खबरदारी घेतली जाईल व मासाचे तुकडे, हाडे, तसेच कोंबड्यांची पिसे रस्त्यावर येणार नाहीत नगरपंचायतीची गाडी आठवड्यातून दोन वेळा येऊन संपूर्ण साफसफाई करून घेईल." अकोला फाटा ते शेलू फाटा मार्गावरील मास वीक्रेत्यांना ही त्यांची दुकाने रस्त्याच्या दहा फूट आत हलवीण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सोबत रस्त्यावर कोंबडीचे पिंजरे व कापायची हत्यारे दिसणार नाहीत यासाठी हिरव्या जाळ्यांची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. सोनुने यांनी स्पष्ट केले की, "रस्त्यावर कोणतेही मास कापले जाणार नाहीत आणि कचरा साठणार नाही,याची जबाबदारी विक्रेत्यांनी घेतली पाहिजे." सुनिल शर्मा यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने नगरपंचायतीने हे पाऊल उचलले त्यामुळे त्यांनी आता आपले आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे शर्मा यांनी सांगितले की, "प्रशासनाने आमच्या मागण्यांची दखल घेतल्यामुळे आम्ही उपोषण स्थगित करत आहोत मात्र,जर प्रशासनाने दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही,तर आम्ही पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारू." या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे प्रशासनाच्या या कठोर पावलामुळे परिसर स्वच्छ व सुरक्षित राहील,अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## प्रा सचिन माथेफोड याना आदर्श शिक्षक पुरस्कार

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



पुणे- सुनिल सुज्ञान ज्ञानदेव भोसले आज रोजी उरुळी कांचन येथे अखिल भारतीय राज्य मराठी परिषद व पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्य स्तरीय काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.यामध्ये सामाजिक,शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.आळंदी म्हातोबा येथील शिक्षक प्रा सचिन माथेफोड याना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. ऊसतोड कामगार यांच्या मुलांसाठी तसेच पालावरील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी माथेफोड सर काम करत असतात.शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.यावेळी राज्य भरातून कवी व साहित्यिक एकत्र आले होते. तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे,प्रा सुरेश वाळेकर,संमेलन अध्यक्ष सूर्यकांत नामुगडे,साहित्य परिषद राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे,क्रीडा अधिकारी माणिक देवकर,मा. जि. प सदस्य महादेव कांचन आदी मान्यवर उपस्थित होते.

## शासकीय रेखाकला परिक्षेत यावर्डीचे 32 पैकी 32 विद्यार्थी उत्तीर्ण.

### यशाची परंपरा कायम, विद्यालयाचा शासकिय रेखाकला परीक्षेचा निकाल 100%

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



कारंजा --येथून जवळच असलेल्या बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डी येथील ३२ पैकी ३२ विद्यार्थी शासकीय रेखाकला परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षक राजेश शेंडेकर आणि शालिनी ओलीवकर यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक विजय यांच्या हस्ते करण्यात आला.

इंटरमीडिएट चित्रकला ग्रेड परीक्षेमध्ये १६ व एलिमेंट्री ग्रेड परीक्षे मध्ये १६ असे एकुण ३२ विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण झालेत. त्यांनी प्राप्त केलेल्या यशा बद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय भड यांनी विद्यार्थी व शिक्षक यांचे पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष योगेश खोपे तसेच वामनराव घोडे, हरिदास गंन्दे,देविदास काळबांडे व विद्यालयाचे शिक्षिक गोपाल काकड, अनिल हजारे शिक्षकेत्तर कर्मचारी भालचंद्र कवाणे, राजू लबडे, राजेश लिंगाटे, राजेंद्र उमाळे यांनी अभिनंदन केले.

## अडीच क्विंटल प्लास्टिक पिशव्या जप्ती दिखाऊ भाग नगरपंचायत ला अचानक कशी आली जाग

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



मालेगाव: - नगरपंचायत प्रशासनाला काल मंगळवारी आठवडी बाजाराच्या दिवशी अचानक जाग आली आणि आठवडी बाजारातून तब्बल अडीच क्विंटल प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या ही कारवाई दिखाऊ पणाचा भाग असल्याचीच चर्चा केली जात आहे.

शहरात सर्वत्र प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे. या पिशव्या मुळे मुक्या जनावरांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच पिशव्या गटार व नाल्यात पडून त्या तुंबल्या आहेत. प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा.अशी मागणी लोकांतून सातत्याने केली जात होती.अखेर नगर पंचायतला प्रशासनाला काल मंगळवारी आठवडी बाजाराच्या दिवशी जाग आली आणि तब्बल अडीच क्विंटल प्लास्टिकच्या पिशव्या जप्त करण्यात आल्या आहेत.

मुख्याधिकारी पंकज सोनुने यांच्या मुख्य मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली आहे. मात्र पुढे कारवाई केली जात होती, आणि मागे सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर बाजारात केला जात होता. काही व्यापारी तर नगर पंचायत कर्मचाऱ्यांशी वाद सुद्धा घालत होते.नगर पंचायत कर्मचारी एक वाजता प्लास्टिक पिशव्या जप्त करून परत गेल्यावर पुन्हा प्लास्टिक पिशव्यांचा वापर व्यापारी सुरू झाल्याचे चित्र पहायला मिळत होते.

जप्तीची कारवाई तोंड पाहून केली जात आहे.असे व्यापारी लोकांतून बोलले जात होते. प्लास्टिक पिशव्या चा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्या ऐवजी त्यांच्या निर्मिती कंपनीवरच कारवाई का केली जात नाही? असा प्रश्न लोक उपस्थित करीत होते.

## मानोरा तालुक्यामध्ये बालकामगारांचे वाढते प्रमाण

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

मानोरा तालुक्यामध्ये बालकामगारांचे वाढते प्रमाण बालकांचा हक्क आणि त्यांचे अधिकार बालकामगार हा 14 वर्षाखालील मुलगा मुलगी ही बालकामगार ठरलेली आहे कारण चौदा वर्षापर्यंतचे त्यांचे वय हे बाल्यावस्था म्हणून भरली जाते हे वय त्यांचे शिक्षण घेण्याचे खेळण्याबागढण्याचे आहे या वयात पालकांनी सुद्धा आपल्या मुला मुलींना त्यांचे पुढील भविष्य उज्वल करण्यासाठी आणि त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी आपले नैतिक कर्तव्य म्हणून त्यांना त्यांचे बालकांचे अधिकार प्रदान करताना शिक्षणच दिले पाहिजे त्यांच्यावर ह्या वयामध्ये कोणतेही काम, श्रम लादू नये हा कायदा श्रीमंता पासून श्रीमंतांच्या मुला मुलींपासून गोरगरिबांच्या व अगदी फूटपाथवर जीवन जगणाऱ्यांना लागू आहे याची कुणी तक्रार केल्यास किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यास या बालमजूर कायद्यानुसार संबंधित मालकास व कामगार मिस्त्रीस किंवा ठेकेदारास सज्जा आणि दंडही होऊ शकतो म्हणून प्रत्येक दुकानदाराने ठेकेदाराने कामगार मिस्त्री ने आपल्या कामावर 14 वर्षाच्या आतील मुला मुलींना ठेवू नये कारण काम करीत असताना त्यांचे शरीर त्यांचे अवयव नाजूक असतात त्या नाजूक अवयवांना इजा होऊन त्यांच्या मेंदूवर, प्रमस्तीस गावांवर मोठा परिणाम होऊन त्यांचे पुढील भविष्य धोकादायक ठरू शकते म्हणूनच भारतीय घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या संरक्षणासाठीच बालकामगार विरोधी कायदा केलेला आहे आणि या कायद्याची अंमलबजावणी सरकारने सुद्धा केलेली आहे म्हणून याची सर्वांनी नोंद घेऊन बालकामनारा संरक्षण द्यावे.



महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यन प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातील झुंजार व्यक्तिमत्व गणेशराव पडघन काळाच्या पडद्याआड.

## अंत्यसंस्काराला प्रा.जोगेंद्र कवाडे यांची उपस्थिती, आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांना झाले अश्रू अनावर

महाराष्ट्र जीत : प्रविण पट्टेबहादुर

वाशिम- पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे मराठवाडा प्रदेश अध्यक्ष मा. गणेशरावजी पडघन गुरुजी उर्फ अण्णा यांचे दिनांक 21 रात्री दोन वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रात,पीपल्स रिपब्लिकन पक्षासह आंबेडकरी चळवळीमध्ये शोककळा पसरली आहे. माननीय प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सर राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या खांद्याला खांदा लावून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला मिळावे यासाठी त्यांनी नामांतराचा लढा लढला. त्यांनी त्यांच्या आयुष्यात बरेच आंदोलन दलित चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार महाराष्ट्रभर पसरवीण्याचे काम केले आहे.त्यांचा अंत्यविधी 21 जानेवारी 2025 दुपारी दोन वाजता त्यांच्या मूळ गावी मौजे जुमडा तालुका जिल्हा वाशिम येथे संपन्न झाला आहे.

त्यांना शेवटची श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी यावेळी लॉन्ग मार्च प्रणेते प्राध्यापक जोगेंद्र कवाडे आंबेडकरी चळवळ येथील ज्येष्ठ नेते गोपाळराव आटोटे पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने अंत्यसंस्काराला उपस्थित होते. यावेळी आंबेडकरी चळवळीतील त्यांच्या समवेत काम केलेल्या कार्यकर्त्याला अश्रू अनावर झाले. यावेळी गोपाळराव आटोटे हे गणेशराव पडघन गुरुजी यांचे अंतिम दर्शन घेत असताना त्यांचे देखील अश्रू अनावर झाले. गणेशराव पडघन गुरुजी यांच्या जाण्यामुळे आंबेडकरी चळवळीमध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे.





# गावं विकास आराखडा तयार करताना नऊ संकल्पनेचा व 17 ध्येयांचा विचार करावा.

## यशदा प्रशिक्षक प्रवीण पट्टेबहादूर यांचे गणस्तरीय कार्यशाळेत प्रतिपादन

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशिम -राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाचा आमचं गाव आमचा विकास या धोरणानुसार गाव विकास आराखडा तयार करण्यासाठी तालुक्यातील फाळेगाव थेट येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि.21. जानेवारी 25 रोजी गणस्तरीय कार्यशाळा आयोजित केली होती.यावेळी गणस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटक म्हणून सरपंच सरपंच सुभाष कोरडे, शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर, तनपुरे सर, ग्रामपंचायत अधिकारी वडजे मॅडम प्रवीण प्रशिक्षक प्रवीण पट्टेबहादूर यांची उपस्थिती होती.

सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर गणस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन सरपंच सुभाष कोरडे यांनी केले. नंतर यशदाचे मास्टर ट्रेनर प्रवीण पट्टेबहादूर




यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की,गाव विकास आराखडा तयार करताना नऊ संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे.तसेच १७ ध्येयाचा जर विचारात घेऊन त्या पद्धतीचे जर गावं विकास आराखडा तयार केला तर नक्कीच गावाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.पुढे मास्टर ट्रेनर प्रविण पट्टेबहादुर यांनी सांगितले की,आरोग्यदायी गांव,बालस्नेही,जलसमृध्द, स्वच्छ व हरित गांव सामाजिक दृष्ट्या सुरक्षीत गाव ,सुशासन युक्त व लिंग समभाव युक्त गाव या नऊ संकल्पना वर आधारित आपला ग्रामपंचायतचा विकास आराखडा असला पाहिजे. त्यासाठी समन्वयाने गांव विकास आराखडा तयार करून आपल्या गावाचा विकास आराखडा तयार करावा.यावेळी गणस्तरीय कार्यशाळेचे प्रास्ताविक ग्रामपंचायत अधिकारी वानखेडे साहेब यांनी केले.तर आभार प्रदर्शन राम झाटे यांनी केले.कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य,कर्मचारी, अंगणवाडी सेविका,आरोग्य सेविका,सेवक,महीला बचतगटांच्या प्रतिनिधी उपस्थित होत्या. फाळेगाव थेट गणातील महीला पुरुष यांची उपस्थिती होती.

# विभागीय आयुक्तांनी शिरपूर जैन सरपंच अपात्र घोषित केले.

## अनधिकृत विहीर बुजविणे व जलकुंभ पाडणणे भोवले

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

मालेगांव:- अमरावती विभागीय आयुक्त यांनी एका आदेशाद्वारे शिरपूर जैन येथील सरपंच राजकन्या संतोष अढागळे यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर तथा दिरंगाई केल्याचे स्पष्टपणे दिसून आल्याने महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५९चे कलम ३९(१) मधील तरतुदीनुसार सरपंच व सदस्य ग्रामपंचायत या पदावरून अपात्र घोषीत करण्यात आले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांनी सरपंच ग्रामपंचायत शिरपूर यांचे विरुद्ध चौकशी करण्याबाबत मागणी केली त्यानुसार विभागीय आयुक्त अमरावती यांचे कडून दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या प्राप्त परवानगी नुसार त्यांनी चौकशी करून तसा अहवाल दिनांक ०८/०५/२०२३ रोजी विभागीय आयुक्त अमरावती यांच्या कडे सादर केला.

त्यानुसार ग्रामपंचायत मालकीच्या विहिरीची नोंद ग्राम पंचायतीचे दप्तरी मालमत्ता रजीस्टरला घेण्यात आली नाही , ग्राम पंचायतीने मासिक सभेत ठराव पारित करूनही बुजविण्यात आलेल्या विहिरीतील गाळ उपसला , ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे ग्रामपंचायतीचे मालकीची नगीना उर्फ मदिना मस्जिद परिसरातील विहीर भूईसपाट झाली. व ग्रामपंचायतीने संबंधीत दोषी विरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही.. आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या श्री जानगीर महाराज संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकीची ग्राम पंचायतीचे दप्तरी नोंद नाही. तसेच सदरील विहिरीची देखभाल दुरुस्ती करणे ही ग्रामपंचायतीची, म्हणजेच पंचायतीच्या वतीने सरपंच व सचिवाने आपली जबाबदारी पार पाडली नाही , जिल्हा परिषद वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र.८३७ दिनांक ०२.०३.२०२३ चे पालन करणे बाबत सरपंच व सचिवाने आपली जबाबदारी पार पाडली नाही. वरील प्रमाणे सरपंच राजकन्या संतोष अढागळे सरपंच ग्रामपंचायत शिरपूर जैन ह्या महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५९चे कलम ३९(१) मधील तरतुदीनुसार दोषी आढळून आल्याने अपात्रतेच्या कारवाईस पात्र ठरल्या आहेत असे अमरावती विभागीय आयुक्तांच्या आदेशात म्हटले आहे.

# पीकविम्यासाठी स्वाभिमानीचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन.

महाराष्ट्र जीत : नकूल उपाध्ये

वाशिम(प्रतिनिधी)जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा खरीप २०२४ च्या सोयाबीन नुकसानीचा पीकविमा व रब्बी २०२४ मधील हरबरा, गहू पिकांचा पीकविमा देण्यात यावा आणि अतिवृष्टी व अवकाळी पावसाने बाधित शेतकऱ्यांना सरकारने जाहीर केलेली मदत तात्काळ देण्यात यावी. या मागण्यांसाठी स्वाभिमानीचे युवक प्रदेशाध्यक्ष दामूअण्णा इंगोले व विदर्भ सचिव राम इढोळे गजानन इढोळे यांच्या नेतृत्वात वाशिमच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केलं. यावेळी स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांसह शेतकरी सहभागी झाले होते. दरम्यान ३१ जानेवारी पर्यंत पिकविमा देण्यासंदर्भात कारवाई करू असं आश्वासन पिक विमा कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक सोमेश देशमुख यांनी आश्वासन दिल्या



नंतर आंदोलन मागे घेण्यात आल. या संदर्भात २ व १६ जानेवारी रोजी दोन वेळा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आलं मात्र त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने आज ठिय्या आंदोलन करण्यात आलं. वाशिम जिल्ह्यात पीकविम्यासाठी नियुक्त केलेल्या भारतीय कृषी विमा कंपनी (AIC) कडून शेतकऱ्यांना मंजूर झालेली पीकविम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. तसेच पीक नुकसानीचे सर्व्हे करतानाही चुकीचे सर्व्हे केल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. पीक विमा योजना खरीप २०२४ चालू वर्षी विमा कंपनी कडून पीक नुकसानीच्या सर्वेक्षणात मोठा गोंधळ झाला असून.सोयाबीन पिकाचे ८८००० सर्व्हे कंपनीने रब्बी हंगामात एका जागेवर बसून केल्याने शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले आहे. या संदर्भात कंपनीवर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा. तसेच खरीप आणि रब्बी हंगामातील पिक विमा शेतकऱ्यांना दाखला देण्यात आला या मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आलं. तर कंपनीने पिक विमा देण्यात दहा हजार शेतकऱ्यांना घेऊन पुढील आंदोलन करण्यात येईल असा इशारा दामू अण्णा इंगोले यांच्याकडून देण्यात आला.

# पिपल्स रिपब्लीकन पार्टीच्या नामांतर जाहीर सभेला नागरिकांची उसळली अलोट गर्दी - प्रा. जोगेंद्र कवाडे यांचे मार्गदर्शन

महाराष्ट्र जीत : प्रविण पट्टेबहादुर

वाशिम - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर वर्धापन दिनानिमित्त पिपल्स रिपब्लीकन पार्टी जिल्हा शाखेच्या वतीने गुरुवार, १६ जानेवारी रोजी स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानात झालेल्या जाहीर सभेला नागरिकांची अलोट गर्दी उसळली. प्रा. जोगेंद्र कवाडे यांचे विचार ऐकण्यासाठी हजारो नागरिकांनी आपली उस्फूर्त हजेरी लावली. सभेला अध्यक्षस्थानी पिरीपाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा आ. प्रा. जोगेंद्र कवाडे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा समाजसेवक आशिष इंगोले, उद्घाटक म्हणून पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदिप कवाडे तर स्वागताध्यक्ष म्हणून अनिल ताजणे, सामाजीक कार्यकर्ते डॉ. तुषार गायकवाड, विजय मनवर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून रामप्रभु सोनोने, डॉ. सिद्धार्थ देवळे, माणिकराव सोनोने, नरेंद्रसिंह ठाकुर, चरणदास इंगोले, सरकार इंगोले, विनोद पट्टेबहादूर, सुनिल तायडे, गजानन भालेराव, ॲड. रितेश हिवराळे, अनंतकुमार जुमडे, अनिल कांबळे, ग.ना. कांबळे, डॉ. संजय वानखेडे, डॉ. विलास इंगळे. डॉ. अल्काताई मकासरे, डॉ. नरेश इंगळे, राजु दारोकार, राष्ट्रपाल हिवराळे, रवि भगत, गणेश उफाडे, युवराज झरे, निलेश अवचार, शालीक वानखेडे, मधुकर घुगे, राजेश्वर लबडे, मंगेश कांबळे, संघपाल घुगे, अश्विनी कांबळे, पियु भालेराव, सुबोध कांबळे, दिपक हिवराळे, सुशिल क्षिरसागर, आकाश खंडारे, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमामध्ये सामाजीक व नामांतर चळवळीमध्ये कार्य केल्याबद्दल डॉ. वसंतराव गायकवाड, संघमित्रा धम्मसेवा महिला मंडळाच्या




अध्यक्षा प्रतिभाताई सोनुने, त्रिरत्न बुद्ध मंडळाच्या अध्यक्षा अरुणाबाई ताजणे, कमलबाई तायडे, वैशाली मेश्राम, राजरत्न अंभोरे, डॉ. सुभाष चंद्रशेखर यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी कार्यक्रमाचे आयोजक व जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे यांच्या हस्ते प्रा. जोगेंद्र कवाडे, जयदीप कवाडे यांचे पुष्पहार घालुन स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी आपल्या भाषणातून नामातंर दिनाचे महत्व सांगीतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पिरीपाच्या जिल्हयातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# महावितरण भरती प्रकियेचा परीक्षेत घोळ झाल्याचा आरोप, पारदर्शकता न पाळता भरती प्रकिया राबवल्याचा परीक्षार्थींचा आरोप

महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे

MSEDCL द्वारे सहाय्यक अभियंता (AE) व कनिष्ठ अभियंता (JE) निवड प्रक्रियेबाबत काही गंभीर शंका व्यक्त करण्यात येत आहे निवड यादी 15/01/2025 रोजी संध्याकाळी 6:28 वाजता प्रकाशित करण्यात आली, परंतु पोर्टलवर ती तारीख 14/01/2025 दर्शवली गेली आहे. ही विसंगती प्रक्रियेवर शंका निर्माण करते अपात्र उमेदवारांचे गुण जाहीर करण्यात आलेले नाहीत. तसेच, निवड झालेल्या उमेदवारांचे गुण कसे मोजले गेले, याची कोणतीही माहिती दिलेली नाही जाहिरातीनुसार CBT साठी 90% व GATE विद्यार्थ्यांसाठी 10% गुणांचे वजन वाटप करण्यात आले आहे. मात्र, GATE गुण कसे पडताळले गेले किंवा मोजले गेले यावर कोणतेही स्पष्टीकरण नाही,मूळ निवड यादी मध्यरात्री वेबसाइटवरून काढण्यात आली आणि 16/01/2025 रोजी सकाळी 10:30 वाजता पुन्हा प्रसिद्ध करण्यात आली, यामागचे कारण अद्याप अस्पष्ट आहे, निवड यादीत जवळपास 111 सलग नावे विशिष्ट केंद्रावरून असल्याचे दिसते, जे अत्यंत संशयास्पद आहे आणि तपासाची आवश्यकता



आहे,21/01/2025 पासून सुरू होणाऱ्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेसाठी GATE संबंधित कोणतेही पुरावे नमूद केलेले नाहीत, ज्यामुळे अधिक शंका निर्माण होतात, संपूर्ण प्रक्रिया घाईघाईने राबवली गेली असल्याचे दिसते, ज्यामुळे उमेदवार आणि अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. CBT व GATE गुणांचे वजन कसे मोजले गेले याबाबत स्पष्टता द्यावी. सर्व उमेदवारांचे गुण प्रकाशित करून पारदर्शकता राखावी,यादीतील सलग नावे व संशयास्पद पॅटर्नची चौकशी करावी,यादी काढून पुन्हा प्रकाशित करण्यामागचे कारण स्पष्ट करावे. GATE गुणांचे योग्य पडताळणी झाली आहे का हे स्पष्ट करावे,कोणत्याही भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता हे अत्यंत महत्त्वाचे असते अशा प्रकारची मागणी परीक्षार्थी करत आहे ...

# 'जनकल्याण फाउंडेशनच्या स्वच्छता मोहिमेत दर्शन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा मुलाचा सहभाग'

## 'कचरा टाका योग्य ठिकाणी,पर्यावरण राहिल सदा आनंदी'

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

देवळाली कॅम्प -जनकल्याण फाउंडेशन देवळाली यांच्या पुढाकाराने सप्टेंबर 2024 पासून स्वच्छता, तयात रस्त्याच्या कडेची साफसफाई मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेचा उद्देश शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता. या उपकरणात उपक्रमात कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष सचिन ठाकरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले तसेच 'दर्शन अकॅडमी पब्लिक स्कूल देवळाली' या शाळेच्या इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. या मोहिमे अंतर्गत विद्यार्थी व इतर



स्वयंसेवकांनी मुख्य रस्त्यावरील कचरा साफ करण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली. विद्यार्थ्यांनी खास करून प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावली. दर्शन अकॅडमीचे शिक्षक व विद्यार्थी यांनी या मोहिमेत हिस्सा घेऊन नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचवला. ही मोहीम विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व शिकवते आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देते. अशा उपक्रमांमुळे तरुण पिढी स्वच्छतेबाबत जागरूक होऊन समाजासाठी कार्य करू लागेल असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.यावेळी फाउंडेशन च्या अध्यक्ष नाजणींन तारवाला,पल्लवी कुलकर्णी ,होवी पुनावाला, भाग्यश्री पवार,उषा किरण,सोनाली गायकवाड,तसेच अन्य सदस्य उपस्थित होते.

महत्त्वाचे

## मेडशी येथे भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन




मालेगाव :- तालुक्यातील श्री खंडोबा महाराज संस्थान मेडशी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री खंडोबा महाराज यात्रा कमिटी व समस्त गावकरी मंडळ मेडशी यांच्या माध्यमातून भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महोत्सवामध्ये दरवर्षी प्रमाणे श्री हरिनाम सप्ताह, महापुराण भागवत कथा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. ह भ प प्रभु महाराज गोभणीकर यांच्या मार्गदर्शन व उपस्थिती भागवत प्रारंभ, तसेच बुधवार दि: 22 जाने 2025 रोजी रात्री 8ते 11भजनाची वेळ असेल.पौष वद्य 15 मौनी अमावस्य बुधवार 29 जाने 2025 रोजी सकाळी 9 ते 11 काल्याचे किर्तन तसेच बुधवार दि: 29 जानेवारी रोजी दुपारी 12 वाजता बारी पद्धतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी परिसरातील सर्व गाव खेड्यातील भाविक भक्तांनी व गावकऱ्यांनी श्री खंडोबा महाराज भव्य यात्रा महोत्सवाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आव्हान श्री खंडोबा महाराज यात्रा कमिटी व समस्त गावकरी मंडळ मेडशी यांच्याकडून भिंती पत्रक व समाज माध्यमाद्वारे करण्यात येत आहे.

# शासकीय रेखाकला परिक्षेत यावर्डीचे 32 पैकी 32 विद्यार्थी उत्तीर्ण.

## यशाची परंपरा कायम, विद्यालयाचा शासकिय रेखाकला परीक्षेचा निकाल 100%

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

कारंजा-येथून जवळच असलेल्या बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डी येथील ३२ पैकी ३२ विद्यार्थी शासकीय रेखाकला परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षक राजेश शेंडेकर आणि शालिनी ओलीवकर यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक विजय यांच्या हस्ते करण्यात आला.

इंटरमीडिएट चित्रकला ग्रेड परीक्षेमध्ये १६ व एलिमेंट्री ग्रेड परीक्षे मध्ये १६ असे एकुण ३२ विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण झालेत. त्यांनी प्राप्त केलेल्या यशा बद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय भड यांनी विद्यार्थी व शिक्षक यांचे पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष योगेश खोपे तसेच वामनराव घोडे, हरिदास गंन्दे,देविदास काळबांडे व विद्यालयाचे शिक्षिक गोपाल काकड, अनिल हजारे शिक्षकेत्तर कर्मचारी भालचंद्र कवाणे, राजू लबडे, राजेश लिंगाटे, राजेंद्र उमाळे यांनी अभिनंदन केले.



# घरकुल अपहार प्रकरणी फौजदारी कार्यवाही करुन गुन्हे दाखल न केल्यास सामुहिक आत्मदहनाचा इशारा....

### घरकुल योजनेत लाभार्थ्याचे नाव एक अनुदान दुस-याच खात्यावर, गटविकास अधिका-यास निवेदन देऊन गैरकारभार करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी..

महाराष्ट्र जीत :प्रतिनिधी

वाशिम : मालेगाव पंचायत समिती मध्ये घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असुन याची कुजबुज झाल्याने अनेक अधिका-याची धाकधूक वाढली आहे. आडनावाचे साधर्म्य लक्षात ठेवून अनु.जाती. जमाती करीता असलेली रमाई घरकुल योजनेतून लाभार्थी एक मात्र लाखोचे अनुदान दुस-याच खात्यात टाकल्याचा प्रकार किन्ही राजा येथील अनेक लाभार्थ्यासोबत घडल्याने या किन्हीराजा येथील लाभार्थ्यानी दि. २१ जानेवारी २०२५ रोजी गटविकास अधिकारी, मालेगाव यांना निवेदन देऊन भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे निलंबन करुन गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनातून केली आहे. पारदर्शक चौकशी करुन निलंबनासह गुन्हे दाखल न केल्यास गणतंत्र दिनाचे दिवशी पंचायत समिती मालेगाव कार्यालयात सामुहिक आत्मदहनाचा




इशारा किन्हीराजा येथील सुभाष सातपुते, रामकृष्ण अंभोरे यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. निवेदनात नमुद आहे की,

आम्ही किन्हीराजा येथील रहिवासी असुन प्रधानमंत्री आवास योजना सन २०२१-२२ अंतर्गत आम्हाला घरकुल मंजुर झालेले होते, सदर मंजुर घरकुलाचे आयडी. क्रं. एम.एच. १२५६१६१९४ प्रमाणे घरकुल मंजुर करण्यात आले. परंतु सदर रक्कम १,३८,०००/- गावातील रितेश रामजी राठोड यांच्या नावे जमा करुन सदर रक्कम संगमताने काढण्यात आली. तसेच अजित रामकृष्ण अंभोरे हा माझा मुलगा असुन मी रामकृष्णा अंभोरे मला रमाई आवास योजना सन २०२३-२४ आयडी अंतर्गत. क्रं. एम.एच.-३२००२-०४७००३/ RAYS६३५११७११ क्रमांकाचे घरकुल मंजुर झालेले असुन सदर घरकुलाची रक्कम रु. १,२०,०००/- दुस-या व्यक्तीच्या नावाने वर्ग करण्यात आली सदर रकमेचा अपहार झाला असुन आमचे निर्दशनास आले आहे., आम्ही दोघेही अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती जाती प्रवर्गातुन असुन यापूर्वी देखील आम्ही वरीष्ठांकडे वारंवार चौकशी करुन पत्रव्यवहार केल्याचे नमुद आहे. सदर अपहाराची सखोल चौकशी करुन सहभागी सर्व अधिकारी कर्मचारी यांचेवर निलंबनाची कारवाई करुन गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागणी मंजुर न केल्यास गणतंत्र दिनी पंचायत समिती कार्यालयातआत्मदहनाचा इशारा संबंधितांना देण्यात आला आहे.

# सरपंच अमोल ठाकरे प्रजासत्ताकदिनी जाणार दिल्लीला

### कारंजा तालुक्याला प्रथमच मिळाला मान-

महाराष्ट्र जीत :प्रतिनिधी

कारंजा - तालुक्यातील वाई येथील सरपंच अमोल ठाकरे व पत्नी आरती अमोल ठाकरे यांना दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. या संदर्भात नुकतेच वाशीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र प्राप्त झाले आहे. या वर्षी दिल्ली येथे २६ जानेवारी रोजी संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडकरिता वाशीम जिल्ह्यातून वाई ग्रामपंचायतीची निवड झाली असून कारंजा तालुक्याला हा बहुमान प्रथमच मिळाला आहे. नवी दिल्ली येथे भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये उपस्थित राहण्यासाठी राज्यातून प्रत्येक जिल्ह्यातून ग्रामपंचायत सरपंचांची नावे त्यांच्या कुटुंबासह केंद्र शासनाच्या सुचनानुसार निवड करण्यात आली आहे. या



संदर्भात डॉ. प्र. सु. गांगुर्डे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र संबंधित विभागाला प्राप्त झाले. तालुक्यातील वाई ग्रामपंचायतीच्या सरपंचाला प्रथमच हा बहुमान मिळाल्याने त्यांचे सरपंच संघटना, तसेच गावकरी व पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

# स्व. डॉ.सुलभा इंगोले विद्यालयातील अध्यक्ष संचालकांचा आदिवासी कर्मचारी सोबत भेदभाव...

### कर्मचारी गजानन सयाम याचा 5 वर्षापासुन संचालक मंडळ सोबत संघर्ष..

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

कारंजा लाड -तालुक्यातील ग्राम वापटी कूपटी येथील स्व डॉ. सुलभाताई इंगोले विद्यालयातील चतुर्थ कर्मचारी गजानन सयाम हे संस्था स्थापनेपासून या शिक्षण संस्थेत चौकीदार म्हणुन कार्यरत होते सुरवातीच्या काळात संस्था अध्यक्ष डॉ पंजाबराव इंगोले यांनी त्यांना घरातील कामगार म्हणुन वापर केला घरातील व शेतातील कामे करून घेतले नंतर आपन संस्थेवर नौकरीवर आहोत त्यामुळे आपल्याला संस्थेची कामे सांगा असे म्हणुन गजानन सयम यांनी घरकाम करण्यास विरोध केल्याने त्याला संस्थेतून काढल्याचा आरोप आदिवासी समाजाचे गजानन सयाम यांनी केला आहे. सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील वापटी कूपटी येथील स्व. डॉ सुलभाताई इंगोले विद्यालयात चौकीदार पदावर कार्यरत असलेल्या आदिवासी समाजाच्या गजानन सयाम याला शेतातील व घरातील काम का करीत नाही म्हणुन संस्थेतून कमी केल्याची धक्कादायक घटना उजागर झाली आहे देशात अजुनही जातिवाद असल्याचे यावरुन सिद्ध होते शाळेत धर्म निरपेक्ष मूल्याचे शिक्षण रुजविण्यासाठी विद्यार्थ्यांना मूल्य शिक्षण देणाऱ्या संस्था जर जातिवाद करीत असतिल तर अशा संस्थेवर आदिवासी समजावर अन्याय केल्या प्रकरणी संस्था चालकांवर गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी आदिवासी समाज एकता मंचाने केली आहे. सदर संस्थेत संस्था चालक हे कर्मचाऱ्यावर पाडत ठेऊन सातत्याने मानसिक दडपण आणुन अत्याचार करीत असल्याचे बोलल्या जाते. संस्थाचालक आपल्या संस्थेतील कर्मचारी याना आपल्या वैयक्तिक कामात ठेवत सरकारी पगारात काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याकडून जर शेतीवर किंवा घराची कामे करीत असतिल तर ही शासनाची फसवणूक असुन पगार सरकारी आणि कामे संस्था चालकाच्या शेतातील ही बाब अतिशय गंभीर असल्याने संस्था चालकावर कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

**संस्थेत प्रामाणिक पणे काम करुन मी माझा चरितार्थ चालवित होतो अनेकदा संस्थेत असणारी कामे करुन संस्था अध्यक्षाच्या घरची व शेतातील काम माझ्याकडून करुन घेतल्या गेली मी नकार दिल्याने मला षड्यंत्र करुन संस्थेतून कमी केले त्याविरुद्ध मी गेल्या पाच वर्षीपासून शिक्षण विभागात निवेदन दिले जिल्हा शिक्षणाधिकारी, आयुक्त आणि संबंधिताना निवेदने देत आहो मात्र कोणताच न्याय मिकत नसल्याने माझा संघर्ष चालु आहे आता आम्ही सामुहिक अन्न त्याग आंदोलन करणार आहोत.**
**गजानन सयाम**

# विभागीय आयुक्तांच्या आदेशाने शिरपूर जैन सरपंच अपात्र घोषित

## अनधिकृत रित्या विहीर बुजविणे व जलकुंभ पाडण्याचे प्रकरण भोवले

महाराष्ट्र जीत : महादेव हरणे

वाशिम :- दि.२० जानेवारी २०२५ रोजी विभागीय आयुक्त अमरावती यांनी एका आदेशाद्वारे शिरपूर जैन येथील सरपंच सौ राजकन्या संतोष अढागळे यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर तथा दिरंगाई केल्याचे स्पष्टपणे दिसून आल्याने महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५९चे कलम ३९(१) मधील तरतुदीनुसार सरपंच व सदस्य ग्रामपंचायत या पदावरून अपात्र घोषीत करण्यात आले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांनी सरपंच ग्रामपंचायत शिरपूर यांचे विरुद्ध चौकशी करण्याबाबत मागणी केली त्यानुसार विभागीय आयुक्त अमरावती




यांचे कडून दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या प्राप्त परवानगी नुसार त्यांनी चौकशी करून तसा अहवाल दिनांक ०८/०५/२०२३ रोजी विभागीय आयुक्त अमरावती यांच्या कडे सादर केला. त्यानुसार ग्रामपंचायत मालकीच्या विहिरीची नोंद ग्राम पंचायतिचे दप्तरी मालमत्ता रजिस्टरला घेण्यात आली नाही., ग्राम पंचायतीने मासिक सभेत ठराव पारित करूनही बुजविण्यात आलेल्या विहिरीतील गाळ उपसलेला नाही., ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे ग्रामपंचायतीचे मालकीची नगीना उर्फ मदिना मस्जिद परिसरातील विहीर भूईसपाट झाली. व ग्रामपंचायतीने संबंधीत दोषीविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही.. आमदार निधीतून बांधण्यात आलेल्या श्री जानगीर महाराज संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकीची ग्राम पंचायतीचे दप्तरी नोंद नाही. तसेच सदरील विहिरीची देखभाल दुरुस्ती करणे हि ग्रामपंचायतीची, म्हणजेच पंचायतीच्या वतीने सरपंच व सचिवाने आपली जबाबदारी पार पाडली नाही., जिल्हा परिषद वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र.८३७ दिनांक ०२.०३.२०२३ चे पालन करणे बाबत सरपंच व सचिवाने आपली जबाबदारी पार पाडली नाही. वरील प्रमाणे सरपंच सौ राजकन्या संतोष अढागळे सरपंच ग्रामपंचायत शिरपूर जैन ह्या महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५९चे कलम ३९(१) मधील तरतुदीनुसार दोषी आढळून आल्याने अपात्रतेच्या कारवाईस पात्र ठरल्या आहेत.

# नियमित वाचन "पुस्तक मैत्री" जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडविते- प्रा. डॉ.खुशाल ढवळे

महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे

दि. 7 जाने. 25 रोज मंगळवार ला स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत "पुस्तक जीवनात अमूलाग्र बदल घडविते". असे लेखक प्रा. डॉ.खुशाल ढवळे, वाणिज्य विभाग प्रमुख हे वाचकांशी संवाद साधतांना बोलत होते. कार्यक्रमाचे सुरवातीलाच माऊली मुंगसाजी महाराज व सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमा पुजन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. सुनील चकवे यांचे हस्ते लेखक-वाचक संवाद फलकाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. लेखक. प्रा. डॉ.खुशाल ढवळे वाचकांशी दिलखुलास संवाद साधत होते. एखादा कितीही जिवलग मित्र/मैत्रिण असेल तो/ती प्रत्येक वेळेस कामात येईलच असे नाही किंबहुना त्याच्या व्ययक्तीक अडचणीत तो गुरफटून असेल. आपणास मदत करण्याची, आपणास वेळ देण्याची त्याची इच्छा असतांनाही तो दिलगीर ठरतो. कधी-कधी दगेही मिळतात. मित्र धोगेबाज, दगेबाज ठरतात. पुस्तक मात्र आपणास जीवनाचा सच्चा मित्र असतो तो सदैव आपणास सोबत असतो. इतर कोणाच्याही अडचणीत आपण सहकार्य करु शकतो. आपणाकडील शंभर रुपये मित्रावर खर्च केल्यास आपणास जवळील शंभर रुपये खर्च होवून जाईल, मात्र पुस्तक वाचून आपण मिळविलेले ज्ञान मित्राला दिल्याने आपले ज्ञान मुळीच कमी होणार नाही उलट आपण मित्राला काही ज्ञान दिल्याने तोही काही ज्ञान आपणास देईल तात्पर्य आपलेही ज्ञानात वाढ होईल व मित्राचेही ज्ञानात वाढ होईल. पैसा निघून जाईल, तात्पर्य : वाचनाने मिळविलेले ज्ञान मात्र वाढतच जाईल. वाचन केल्याने पुस्तक आपले जीवनात अमूलाग्र बदल घडवतो. डॉ. बाबासाहेब बी. आर. आंबेडकर, यांनी ज्ञान संपादन केल्याने स्वतः ज्ञानी होवून आपला समाज कितपत अंधार अज्ञानात पडलेला संपूर्ण दिन दलितांचे कैवारी ठरले केवळ वाचनामूळेच मिळविलेल्या ज्ञानामुळे देश विदेशातील डिग्री मिळवूनच. या देशाला संपूर्ण जगातील सर्वोच्च अस "भारतिय संविधान "या देशाला दिल. ज्यावर आज संपूर्ण देशाचा कार्य भार चालतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगात विद्वान ठरले. पुस्तका करिता घर बांधणारा एकमेव महामानव. एवढं आगाड प्रेम पुस्तकावर करणाऱ्या महा मानवाचा आपण आदर्श घ्यावा व आपला उद्धार नक्कीच होईल. सोबतच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. नरेंद्र जाधव, उपराकार लक्ष्मण माने, कोल्हाट्याच पोर - किशोर शांताबाई काळे, अशी अनेक जीवनात अमूलाग्र बदल केलेली उदाहरणे विद्यार्थ्यांना दिली. आजच्या युगात ही पिढी मात्र वाचनापासून खुप दुर होत असल्याची खंत ही त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी वाचनात आवड निर्माण करावी. यामुळेच हा संवाद कार्यक्रम होत आहे. ही काळाची गरज आहे. असे बोलत होते.

प्रा. डॉ.खुशाल ढवळे यांनी वाणिज्य शाखेतील बी. कॉम. भाग दोन करिता " विपणन व्यवस्थापन" व बी. कॉम. भाग एक एनईपी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती याचे अभ्यास क्रमानुसार डॉ. विनोद बंन्सीले, देऊळगाव राजा व डॉ. आर. आर. राठोड बार्शीटाकळी यांचे समवेत लिहिली या विषयाला अनुसरून वाचक विद्यार्थ्यांनं समवेत त्याचा संवाद ग्रंथालय विभागाचे वतीने आयोजीत लेखक वाचक संवाद कार्यक्रमा व्दारे विद्यार्थी



प्रिय ग्रंथपाल मा. डॉ. अमोल वाकोडे यांनी घडवून आणला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चकवे होते तर प्रमुख उपस्थित प्रा. डॉ. संदीप भुरले, प्रा. रवि बोरकर, डॉ. अख्तरुनिसा कुरेशी, प्रा. प्रियंका रुईकर, गजेंद्र इरवे, मनिष लांजेवार, विनोद इंगोले इत्यादी मान्यवर हजर होते. सुत्र संचालन रासेयो प्रमुख डॉ. संदीप भुरले यांनी केले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. अमोल वाकोडे यांनी केले तर आभार मनिष लांजेवार यांनी मानले. कार्यक्रमास वाचकांकडून उत्फुर्द प्रतिसाद मिळाला.

# भव्य नोकरी मेळाव्याचा लाभ घ्यावा.- वाशिम पोलिस

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

मालेगांव-:पोलीस अधीक्षक कार्यालय वाशिम यांच्या पुढाकाराने आयोजित नोकरी मेळाव्याच्या लाभ गरजू व होतकरू तरूणांनानी घ्यावा असे आवाहन पोलिसांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यातील सर्व सुशिक्षित तरुण तरुणींना नोकरीची सुवर्ण संधी,'उमंग' एक संधी स्वप्नपूर्तीची 'उमंग' एक पाऊल स्वप्नपूर्तीचे या धोरणानुसार या मेळाव्याचे आयोजन करण्या मागचा उद्देश असून या नोकरी मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील नामांकित कंपनींचा सहभाग तसेच निवड झालेल्या उमेदवारास तत्काळ नियुक्तीपत्र देखील देण्यात येणार असल्याचे यात नमुद केले आहे.

येत्या१फेब्रुवारी२०२५लाशनिवार सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत हा मेळावा होणार आहे. तेव्हा हॅप्पी फेसेस दि. कन्सेप्ट स्कूल, सेलू बाजार रोड, IUDP कॉलनी, पुसद नाका, वाशिम-444505 येथे गरजू उमेदवारांनी आपली शैक्षणिक पात्रता व इतर आवश्यक कागदपत्रांसह ज्यामध्ये प्रामुख्याने १) बायोडाटा च्या ५ प्रति घेऊन याव्यात,२) २ पासपोर्ट साइज़ फोटो आणावे ,३) इंटरव्यू सकाळी ९ पासून सुरू होतील त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी उपस्थित रहावे असे आवाहन वाशीम जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे (IPS) पोलीस अधीक्षक वाशिम यांनी केले आहे.

१ २ ३ ४ ५ ६